# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर　　**P.S.(ठाणे):** येरवडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0023　　**Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**11/01/2025 13:21

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार　　**Date From (दिनांक पासून):** 10/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 7　　**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/01/2025
**Time From (वेळेपासून):** 19:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 20:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/01/2025　　**Time (वेळ):** 13:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 025
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/01/2025 13:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 03 किमी　　**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शाब्रीज खुराना ट्रव्हल्स,कार्यालयाचे समोरील,रोडवर,संगमवाडी,पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.मनोज मोहन दौंदल

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** मोहन दौंदल

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1974

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उज्वलनगर -3 वडगाव रोड,यवतमाळ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उज्वलनगर -3 वडगाव रोड,यवतमाळ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7620847435

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.संजय भादु गुंजाळ | | वडील का नाम : भादु गुंजाळ | 1. अ◌ 1203, प्रणाम टवर्स,च-होली फाटा, चोविसावाडी, आळंदी रोड, पुणे,येरवडा,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी दराच्या नोटा | 250,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):

250,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद तारीख.11.01.2025

मी. श्री.मनोज मोहन दौंदल, ,वय-51 वर्षे,व्यवसाय-नोकरी,पद-वरीष्ठ लिपीक,उ.वि.क.अ कार्यालय,अकोट,जि.अकोला रा.उज्वलनगर -3 वडगाव रोड ,यवतमाळ मो.बा.क्र.7620847435.

मी दिनांक 10.01.2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे लाच मागणी सबंधाने माझी लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे "मी वरीष्ठ लिपीक म्हणुन उपविभागिय कृषी अधिकारी ,कार्यालय,अकोट जि. अकोला येथे कार्यरत आहे.सन 2019-2020 मध्ये तालुका कृषी अधिकारी जळगाव ,जामोद जि.बुलढाणा या कार्यालयात कनिष्ठ लिपीक या पदावर असतना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना सन-2019-20 मध्ये राबविण्यात येत होती.सदर सिंचन(ठिबक/तुषार) योजनेच्य अंमलबजावणीमध्ये केलेल्या कसुरीच्या अनुषंगाने झालेल्या प्राथमिक चौकशीअंती विभागिय कृषी सहसंचालक,अमरावती विभाग यांनी दिनांक 17/12/2024 रोजी पासुन मला निलंबित केले आहे.दि.18/12/2024 रोजी श्री.धीरज वाकोडे तालुका कृषी अधिकारी ,जळगाव जामोद यांचा मला फोन आला की,श्री.गुंजाळ साहेब तुमचा फोन नंबर मागित आहे.मी त्यांना तुमचा फोन नंबर देऊ का?त्यानंतर मी श्री. वाकोडे यांना त्याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की,मागील सिंचन प्रकरणाबाबत श्री.गुंजाळ यांना बोलायचे आहे.त्यावर मी त्यांना माझा मोबाईल नंबर देऊन दया असे बोललो.त्यानंतर दि.21/12/2024 रोजी श्री.ज्ञानेश्वर शेकोकार ,कृषी सहायक यांचा फोन आला की,तुमच्या सोबत निलंबित झालेले श्री.सावदेकर हे नागपुर येथे गुंजाळ साहेबांना भेटले पण काय झाले आहे ते त्यांनी मला सांगितल नाही.तुम्ही भेटले का?त्यावर मी नाही असे म्हटले व त्यांचेकडुन मला गुंजाळ साहेबांचा मोबाईल नंबर भेटला.

त्यानंतर दिनांक 22/12/2024 रोजी मी श्री.गुंजाळ प्रभारी सहसंचालक फलोत्पादन, उप संचालक सुक्ष्म सिंचन कृषी आयुक्तालय,पुणे यांना फोन केला असता त्यांनी ते यवतमाळ येथील रामायण हॉटेल येथे नाष्टा करीत आहे असे सांगितले व तिथे या म्हटले.मी सदर ठिकाणी जाऊन श्री.गुंजाळ साहेब यांची भेट घेतली त्यावेळी त्यांनी मला सांगितले की,मी तुमचे निलंबन मागे घेतो व सदर प्रकरणातील आक्षेपांच्या अनुषंगाने चौकशी करुन एफ.आय. आर न दाखल करणेसाठी मला 3,00,000/- रुपये दयावे लागतील.श्री.गुंजाळ साहेब यांनी मागितलेली रक्कम ही लाच रक्कम असुन ती देण्याची माझी इच्छा नाही.त्यांच्यात व माझ्यात कोणताही आर्थिक व्यवहार नाही. श्री.गुंजाळ साहेब यांची मी आज दि.10/01/2025 रोजी भेट घेणार असुन लाच मागण्याच्या अनुषंगाने त्यांच्यावर कार्यवाही व्हावी ही विनंती."वगैरे मजकुराची तक्रार लिहून दिले नंतर सदरची तक्रार पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

मी ला.प्र.वि पुणे कार्यालयात असताना 16.48 वा चे सुमारास श्री.गुंजाळ साहेब हे माझे मोबाईल क्रमांक वर व्हॉटस्ॲप द्वारे कॉल करीत असलेबाबत मी पोलीस निरीक्षक निंबाळकर यांना सांगितले.लोकसेवक श्री.गुंजाळ यांचा माझे मोबाईल चे व्हॉटस् ॲप वर फोन येऊन गेल्याने माझ्या मोबाईल व्हॉटस्ॲप क्रमांक 7620847435 वरुन लोकसेवक श्री.गुंजाळ यांचे मोबाईल व्हॉटस् ॲप क्रमांक 7972951840 वर संपर्क करुन सदर फोन कॉल शासकिय व्हाईस रेकॉर्डवर ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरले.त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी त्यांचे कडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर काढून त्यामध्ये सॅनडीस्क कंपनीचे नवीन सिलबंद मेमरीकार्ड त्यांचे वेस्टनातुन बाहेर काढले ते व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले.व्हॉईस रेकॉर्डर चालू करून त्याबाबत माहिती दिली तसेच त्याचे इनबिल्ट मेमरीमध्ये व मेमरीकार्डमध्ये यापुर्वीची कोणतीही फाईल नसल्याचे उपस्थित सर्वांची खात्री करून दिली. त्यानंतर 16.51 वा माझे दुरध्वनीवरुन लोकसेवक गुंजाळ यांचे दुरध्वनीवर व्हॉटस् ॲप कॉल केला व तो लाऊड स्पिकरवर टाकला सदर संभाषणाचे दरम्यान श्री.गुंजाळ साहेब यांनी मला ॲग्री कल्चर कॉलेज शिवाजीनगर ,पुणे येथील गेट शेजारील कँटीन येथे या असे सांगितले व फोन कट केला.

त्यानंतर श्री.गुंजाळ साहेब माझेकडे लाच मागणी करतात अगर कसे? याबाबतची पडताळणी करण्याचे

सर्वानुमते ठरविले. त्यानंतर तात्काळ सापळा पथक,दोन्ही पंच व मी असे शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईकामी लागणारे स्टेशनरी , लॅपटॉप, हेडफोन, काळे पडदे, व्हाईस रेकॉर्डर,अँथ्रासिन पावडर वगैरे साहित्य घेऊन गेलो व अँग्री कल्चर कॉलेज शिवाजीनगर पुणे चे अलीकडे राहुल टॉकीज शिवाजीनगर येथे शासकिय वाहन थांबवुन मला व्हाईस रेकॉर्डर लाऊन देऊन पंच क्र.1 श्री.तुषार कांबळे यांचे सोबत श्री.गुंजाळ पद-उप संचालक,सुक्ष्मसिंचन,कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे यांचेकडे पडताळणीसाठी अँग्रीकल्चर कॉलेज,शिवाजीनगर पुणे येथे पाठवले असता लोकसेवक श्री.गुंजाळ पद-उप संचालक, व माझेमध्ये अँग्रीकल्चर कॉलेज,शिवाजीनगर पुणे येथे गेट समोरील रोडवर कामानिमीत्त चर्चा झाली सदर चर्चेदरम्यान मी श्री.गुंजाळ साहेब यांना तुम्ही यवतमाळला आल्यावर बोलले साहेब, का वा तुम्ही अ याच्यातुनही सस्पेंशन मधुनही काढुन देतो आणि एफआयआर ही करणार नाही असे बोलले होते असे बोललो असता, नाय नाय सस्पेंशन मागे नाय होत आता असे बोलुन तुमची रिकव्हरी आहे चुकीची इन्व्हॉईस भरलेत असे बोलले.त्यावर मी बर तुम्ही एफ.आय.आर बद्यल बोलले होते साहेब.. त्याच्याबद्यल सांगा मला. म्हणजे ते माझ म्हणजे आमच.. माझ्याबद्यल सांगा.. बाकीच्याच जाऊदया.. फक्त तेव्हढ सांगा तुम्ही. असे बोललो.त्यावर गुंजाळ साहेब हे “आम्ही फक्त एव्हढच करु शकतो की.. इथुन काही वाढवा पत्र देणार नाही” असे म्हणाले.त्यावर मी माझ व्ययक्तीक सांगा साहेब..ते त्यांच जाऊदया.असे बोललो असता त्यावर ते मला तुम्हाला तीन दयावे लागतिल असे म्हणाले.मी त्यांना तीन लाख? असे विचारले असता त्यांनी हो म्हणुन माझ्याकडे तीन लाख रुपयांची मागणी केली.त्यानंतर पुन्हा आमचेमध्ये माझ्या कामासंदर्भात चर्चा होऊन मी त्यांना लाचेची रक्कम कमी करणेबाबा विनंती केली असता त्यांनी मला तडजोडी अंती अडीच लाख रुपयांची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना अध्र्या तासात कॉल करतो असे सांगुन नघालो असता लोकसेवक गुजाळ यांनी मला तुम्ही कुठुन ट्रेन ने जाणार आहे का असे विचारले त्यावर मी त्यांना संगमवाडी येथुन ट्रॅव्हलस ने जाणार असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी मला संगमवाडी येथेच भेटु असे सांगितले.त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 सदर ठिकाणाहुन निघुन परत शिवाजीनगर कोर्ट चे समोर मेट्रो स्टेशन येथे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी रिक्षाने आलो.त्यानंतर पोनि निंबाळकर यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला व पडताळणी कारवाई दरम्यान झालेल्या घटनेची माझ्याकडुन व पंच क्र.01 श्री.कांबळे यांचेकडुन थोडक्यात माहिती घेतली त्यानंतर पडताळणी दरम्यान व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता त्यामध्ये लोकसेवक गुंजाळ यांनी माझेकडे माझे वरील निलंबन नंतरच्या कारवाई मध्ये मदत करणेसाठी व माझेवर एफ.आय.आर दाखल न करणेसाठी माझेकडे सुरवातीस 3 (तीन) लाख रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती अडीच लाख रुपयाची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.सदरबाबत सविस्तर स्क्रिप्ट बनवण्यात आली आहे.

त्यानंतर पोनि निबाळकर यांनी माझेकडे लाच रक्कम म्हणुन लोकसेवक यांनी मागणी केलेली रक्कम हजर करणेस सांगितले असता मी माझे जवळील 40 हजार रुपये लाच रक्कम म्हणुन हजर केले.सदर नोटांचे वर्णन एका को-या कागदावर नमुद करण्यात आले. उर्वरीत दोन लाख दहा हजार रुपये हे खेळण्यातील चलनी नोटा वापरण्याचे सर्वानुमते ठरल्याने खेळण्यातील 420 नकली नोटा 500/- रुपये लिहीलेल्या लाच रकमेमध्ये समाविष्ट केल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी शासकिय वाहनामध्ये अँन्थ्रासिन पावडर लावणेबाबत प्रात्यक्षिक केले व अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म पंच व मला समजावून सांगीतले. त्यानंतर लाच रक्कम म्हणुन मी हजर केलेल्या रुपये 40 हजार व खेळण्यातील 420 नकली नोटा 500/- रुपये लिहीलेल्या अँन्थ्रासिन पावडर लावली. तसेच एका पांढ-या लिफाफयासही अँन्थ्रासिन पावडर लावली सदर पावडर लावलेल्या नोटा नमुद पांढ-या लिफाफयामध्ये ठेऊन सदर लिफाफा माझ्या कडील बॅग मध्ये ठेवला. त्यानंतर सापळा कारवाई करणेसाठी शिवाजीनगर न्यायालय, पुणे समोरुन पंच व सापळा पथकासह शासकिय वाहनाने रवाना होऊन खाजगी ट्रॅव्हल बस थांबा संगमवाडी रोड,पुणे येथे पोहोचलो त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने माझे व पंच क्र.01 यांचे सापळा निवेदन घेण्यात आले.त्यानंतर लोकसेवक यांनी लाच रक्कम स्वीकारलेनंतर ती हस्तगत करतेवेळी व लोकसेवक यांना ताब्यात घेतवेळी त्यांचे व्हीडीओ रेकॉडींग करणेत येणार असल्याची पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी माहिती सांगितली.त्यानंतर माझे मोबाईल वरुन लोकसेवक गुंजाळ यांचे मोबाईल व्हॉटस्अँप कॉल केला असता सदर संभाषणा दरम्यान गुंजाळ साहेब यांनी मला संगितम ट्रॅव्हल्स येथे येणेस सांगितले.त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी सापळा कारवाईकामी माझ्याकडे गुंजाळ साहेब यांनी मागणी केलेली लाच रक्कमेसह शासकिय व्हॉईस रेकॉर्डर लावुन देऊन पंच क्र.01 कांबळे यांचेसह संगितम ट्रॅव्हल्स येथे जाणेसाठी पायी सापळा कारवाई कामी रवाना केले.माझे मागुन येऊन सापळा पथक कोणास शंका येणार नाही असे आजुबाजुस थांबुन राहीले.मी संगितम ट्रॅव्हल्स येथे गेलो असता श्री.गुंजाळ साहेब हे शाब्रीज खुराना ट्रॅव्हल्स खाजगी बस थांबा समोरील रोडवर त्यांचे चारचाकी गाडी चे बाजुला थांबल्याचे दिसले.मी तेथे जाऊन त्यांची भेट घेतली.

त्यानंतर आमचेत माझे कामासंदर्भाने चर्चा होवून श्री गुंजाळ साहेब यांनी मला आमचे कार्यालयातील वाकुडे

साहेब व शेकुकार यांचेबाबत विचारणा केली. तसेच त्यांचेविरुध्दही कारवाई न करणेसाठीची रक्कम एकत्रीत रित्या आणुन देणेबाबत सांगीतली.त्यावेळी मी त्यांना माझा सेपरेट करुन घ्या अशी विनंती केली, त्यावर ते मला मी चार जणांना डिल नाही करत बसणार असे म्हणुन आमच्या कार्यालयातील वाकुडे साहेब व शेकुकार यांचेकडील व माझी लाच रक्कम एकत्रीत देणेबाबत सांगीतले. त्यामुळे मी सदर ठिकाणी श्री.गुंजाळ यांची लाच स्विकारण्याची वाट पाहत थांबुन राहीलो.काही वेळाने सदर ठिकाणी आमचे कार्यालयातील वाकुडे साहेब व शेकुकार आले.त्यांनी त्यांचेकडील पांढ-या पिशवीमध्ये लोकसेवक गुंजाळ साहेब यांना देणेकरीता रक्कम आणली असलेबाबत मला सांगीतले.गुंजाळ साहेब यांनी लाचेची रक्कम मागितलेनंतर मी माझेकडील वर नमुद अडीच लाख रुपये लाच रक्कम तसेच वाकुडे साहेब व शेकुकार यांनी दिलेली रक्कम श्री.गुंजाळ साहेब यांना देण्यासाठी गेलो असता श्री.गुंजाळ यांनी सदर लाच रक्कम त्यांचे वाहनाच्या डिक्कीमध्ये ठेवण्याबाबत सांगीतले असता सदर रक्कम मी त्यांचे वाहनाच्या डिक्कीमध्ये ठेवली.त्यानंतर मी लगेच सापळा पथकाला डोक्यावर परिधान केलेली टोपी काढुन पुर्वनियोजित लाच रक्कम स्विकारले बाबत ईशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने श्री.गुंजाळ यांना ताब्यात घेतले. ती वेळ 19.49 वा. चे सुमाराची होती.सदर वेळी दोन्ही पंचासमक्ष गुंजाळ यांचे ताब्यातुन माझेकडुन स्विकारलेली लाच रक्कम 2,50,000/- व इतर 2,15,000/- अशी रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. याबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.10/01/2025 रोजी मी दिलेल्या तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान सिंचन(ठिबक/तुषार) योजनेच्या अंमलबजावणीमध्ये माझ्यावरील आक्षेपांचे अनुषंगाने माझे निलंबन नंतरच्या कारवाई मध्ये मदत करणेसाठी व माझेवर एफ.आय.आर दाखल न करणेसाठी श्री.संजय भादु गुंजाळ,57 वर्षे व्यवसाय-नोकरी, पद-उप संचालक,सुक्ष्मसिंचन,कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे यांनी माझेकडे सुरवातीस 3 (तीन) लाख रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती अडीच लाख रुपयाची मागणी करुन अडीच लाख रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी श्री.संजय भादु गुंजाळ,57 वर्षे व्यवसाय-नोकरी, पद-उप संचालक,सुक्ष्मसिंचन,कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे यांनी माझेकडे सुरवातीस 3 (तीन) लाख रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडी अंती अडीच लाख रुपयाची मागणी करुन अडीच लाख रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी श्री.संजय भादु गुंजाळ,57 वर्षे व्यवसाय-नोकरी, पद-उप संचालक,सुक्ष्मसिंचन, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर,पुणे यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

दाखल अधिकारी- सपोनि श्री पाटील येरवडा पोलीस स्टेशन
तपासी अधिकारी- प्रवीण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, ला प्र वि पुणे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
RAVINDRA DHAIRYASHEEL SHELKE(I (Inspector)) / PBMH72874 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):